साप्ताहिक

''एकच ध्येय... एकच आवाज''

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक - संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक ३६ वा | सोमवार, दि. २१/०९/२०२६ ते दि. २७/०९/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## गणेशोत्सवातून समाजप्रबोधनाची परंपरा अधिक बळकट करा-पालकमंत्री जयकुमार रावल

### धुळे शहरातील विविध गणेश मंडळांना भेटी; सजीव देखावे, सामाजिक जनजागृती उपक्रमांचे केले कौतुक

### 'बाप्पा डॉट ओआरजी' व 'लोकसंवाद २०२६'मध्ये सहभागी होण्याचे आवाहन









धुळे (जिमाका) - सार्वजनिक गणेशोत्सवाला लोकमान्य टिळकांनी जनजागृती आणि समाजप्रबोधनाच्या चळवळीचे स्वरूप दिले. हीच परंपरा पुढे नेत धुळे शहरातील गणेश मंडळांनी श्रद्धा आणि उत्सवाबरोबरच सामाजिक प्रश्नांवर जनजागृती करण्याचे कार्य अधिक व्यापक करावे. गणेशोत्सव हा समाजाला एकत्र आणणारा आणि सकारात्मक विचारांची ऊर्जा देणारा लोकोत्सव आहे, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

पालकमंत्री जयकुमार रावल यांनी शनिवारी, दि. १९ सप्टेंबर रोजी धुळे शहरातील विविध सार्वजनिक गणेश मंडळांना भेटी देऊन श्री गणरायाचे दर्शन घेतले. मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, कलाकार आणि गणेशभक्तांशी संवाद साधत त्यांनी गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. विविध मंडळांनी उभारलेले सजीव देखावे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाजप्रबोधनपर उपक्रमांची पाहणी करून त्यांनी कलाकार व कार्यकर्त्यांचे कौतुक केले. यावेळी महापौर मायादेवी परदेशी, आमदार अनुप अग्रवाल, माजी संरक्षण मंत्री डॉ. सुभाष भामरे, माजी महापौर जयश्री अहिरराव, चंद्रकांत सोनार व प्रदीप करपे, मुंबई बाजार समितीचे संचालक रावसाहेब गिरासे यांच्यासह विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. विविध मंडळांच्या भेटीदरम्यान पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केवळ धार्मिक उत्सव म्हणून नव्हे, तर लोकजागृती आणि समाजाला संघटित करण्याचे प्रभावी माध्यम म्हणून केली. हाच आदर्श डोळ्यांसमोर ठेवून धुळ्यातील अनेक गणेश मंडळे वर्षानुवर्षे सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनपर उपक्रम राबवत आहेत. संवेदनशील सामाजिक विषयांवर सजीव देखावे सादर करून समाजाला विचार करण्यास प्रवृत्त करण्याचे काम मंडळांकडून होत आहे. ही परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे.

एका मंडळाने सादर केलेल्या सजीव देखाव्यातील बालकलाकारांचे कौतुक करताना पालकमंत्री श्री.रावल म्हणाले की, मंदिरात गेल्यानंतर मूर्तीमध्ये जणू प्राण आल्याची अनुभूती होते, तशीच अनुभूती या बालकलाकारांचे सादरीकरण पाहताना आली. लहान मुलांनी अत्यंत प्रभावीपणे साकारलेल्या भूमिका, त्यांचा अभिनय आणि त्यामागे मंडळाच्या कार्यकर्त्यांनी घेतलेले परिश्रम कौतुकास्पद आहेत. हिंदू एकता मित्रमंडळ गेल्या ४७ वर्षांपासून विविध संवेदनशील सामाजिक विषयांवर सजीव देखाव्यांच्या माध्यमातून जनजागृतीची परंपरा जपणाऱ्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कलाकारांचे त्यांनी अभिनंदन केले. जय श्री कृष्ण मित्र मंडळाच्या कार्याचा उल्लेख करताना त्यांनी मंडळाचे भिकन वराडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे विशेष कौतुक केले. दहीहंडी उत्सवाच्या माध्यमातून धुळ्याची ओळख खानदेशासह महाराष्ट्रभर पोहोचली आहे. यंदा काही तांत्रिक कारणांमुळे अपेक्षित स्वरूपात आयोजन करता आले नसले, तरी पुढील वर्षी अधिक व्यापक आणि उत्साहपूर्ण पद्धतीने आयोजन व्हावे, यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असेही पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले. धुळेकरांचे श्रद्धास्थान असलेल्या 'श्रीमंत लालबागचा राजा' गणपतीचे दर्शन घेतल्यानंतर पालकमंत्री रावल म्हणाले की, गणरायावर भाविकांची अपार श्रद्धा आहे. मनोभावे केलेली प्रार्थना गणराया पूर्ण करतो, अशी भाविकांची दृढ धारणा असल्याने मोठ्या संख्येने नागरिक येथे दर्शनासाठी येतात. परिसरातील नागरिक आणि मंडळाचे कार्यकर्ते अत्यंत उत्साहाने, श्रद्धेने आणि आत्मीयतेने या उत्सवात सहभागी होत असल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्या हिंदू आणि महाराष्ट्रीयन संस्कृतीमध्ये विघ्नहर्त्या गणरायाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कोणत्याही मंगल कार्याची सुरुवात श्री गणेशाच्या स्मरणाने केली जाते. प्रत्येकाला मुंबईतील लालबागच्या राजाचे दर्शन घेणे शक्य नसले, तरी त्याच श्रद्धेने आणि भक्तिभावाने धुळेकर येथील गणरायाच्या चरणी नतमस्तक होतात. सार्वजनिक गणेशोत्सवामुळे श्रद्धेबरोबरच सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि लोकसहभागाची भावना अधिक दृढ होते, असे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले.

'बाप्पा डॉट ओआरजी' वर सहभाग नोंदवा - गणेशोत्सवातील धुळ्याच्या वैशिष्ट्यपूर्ण परंपरा, सामाजिक देखावे, आरत्या, सजावट, स्थानिक कलाकारांचे योगदान आणि पिढ्यान्पिढ्या जपलेल्या आठवणी यांचे डिजिटल स्वरूपात जतन होणे आवश्यक आहे. त्यासाठी नागरिकांनी 'बाप्पा डॉट ओआरजी' या डिजिटल लोकचळवळीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा. घरगुती तसेच सार्वजनिक गणेशोत्सवाशी संबंधित छायाचित्रे, व्हिडिओ, कला, संस्कृती, परंपरा आणि आठवणींचे डिजिटल दस्तऐवजीकरण झाल्यास धुळे जिल्ह्याचा समृद्ध गणेशोत्सव वारसा राज्यासह जगासमोर पोहोचेल, असे त्यांनी सांगितले.

लोकसंवाद २०२६' मध्ये सक्रीय व्हा - गणेशोत्सवातील मोठ्या लोकसहभागाचा उपयोग शासनाच्या लोककल्याणकारी योजना आणि उपक्रमांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठीही व्हायला हवा. माहिती व जनसंपर्क विभागाच्या 'गणेशोत्सवातून लोकसंवाद २०२६' उपक्रमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती गणेश मंडळांच्या माध्यमातून थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. धुळे जिल्ह्यात 'लोकसंवाद' चित्ररथाच्या माध्यमातून दृकश्राव्य पद्धतीने शासकीय योजनांची माहिती दिली जात असून, गणेश मंडळांनी या अभियानाला सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन पालकमंत्री श्री. रावल यांनी केले. गणेशोत्सव हा श्रद्धा आणि भक्तीबरोबरच समाजप्रबोधन, लोकसहभाग आणि लोककल्याणाचा प्रभावी मंच ठरला पाहिजे. आपल्या गणेशोत्सवातील समृद्ध परंपरांचे 'बाप्पा डॉट ओआरजी'च्या माध्यमातून डिजिटल जतन करूया आणि 'लोकसंवाद २०२६'च्या माध्यमातून शासनाच्या लोककल्याणकारी योजना अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवूया, असे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले. समाजातील वाईट आणि चुकीच्या प्रवृत्तींचा नायनाट होऊन चांगल्या विचारांचा विजय व्हावा, धुळे शहर व जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना गणरायाचे पाठबळ मिळावे आणि समाजहिताची कामे करण्यासाठी सर्वांना सामर्थ्य लाभावे, अशी प्रार्थना पालकमंत्री श्री.रावल यांनी श्री गणरायाच्या चरणी केली. भाविकांच्या मनातील चांगल्या आशा-आकांक्षा पूर्ण व्हाव्यात, अशा सदिच्छा व्यक्त करून त्यांनी धुळेकरांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

या गणेश मंडळांच्या भेटीदरम्यान हिंदू एकता मित्र मंडळाचे हिरामण गवळी, जय श्री कृष्ण मित्र मंडळ, गल्ली नं. ७ चे भिकन वराडे; मरिमाता मित्र मंडळ, गल्ली नं. ४ चे चेतन गवळी; क्रांतीवीर राजगुरू मित्र मंडळाचे विक्की परदेशी; गणराज प्रतिष्ठान मित्र मंडळाचे राहुल अग्रवाल व ललित आहुजा; जय झुलेलाल मित्र मंडळाचे धिरज परदेशी; जय श्री कृष्ण मित्र मंडळ, सिंचन भवनचे प्रदीप बैरागी; वंदे मातरम् ग्रुपचे शामकांत बोरसे आणि प्रिंस ग्रुपचे नगरसेवक कृपेश नांद्रे यांच्यासह विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, स्थानिक कलाकार, गणेशभक्त व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या गणेश मंडळांना दिल्या भेटी - पालकमंत्री श्री. रावल यांनी हिंदू एकता मित्र मंडळ, राजवाडे बँक समोर लालबाग मित्र मंडळ, गल्ली नं. ७ जय श्री कृष्ण मित्र मंडळ, गल्ली नं. ४ मरिमाता मित्र मंडळ, क्रांतीवीर राजगुरू मित्र मंडळ, गणराज प्रतिष्ठान मित्र मंडळ, जय झुलेलाल मित्र मंडळ, जय श्री कृष्ण मित्र मंडळ, वंदे मातरम ग्रुप आणि प्रिन्स ग्रुप या गणेश मंडळांना भेटी दिल्या.

# गणेशोत्सवातील चार दिवस रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक वापरास विशेष सवलत
## पाचवा, सातवा, नववा दिवस आणि अनंत चतुर्दशीपुरतीच सवलत
## ध्वनीमर्यादांचे काटेकोर पालन बंधनकारक-जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते

धुळे (जिमाका) – महाराष्ट्राचा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा होत असलेल्या श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर, यंदाच्या उत्सव कालावधीत शाळकरी विद्यार्थी, नोकरदार वर्ग तसेच सर्वसामान्य नागरिकांना धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेता यावा, यासाठी सार्वजनिक गणेश मंडळांच्या विनंतीचा विचार करून गणेशोत्सवातील पाचवा दिवस, सातवा दिवस, नववा दिवस आणि अनंत चतुर्दशी अशा एकूण चार दिवसांसाठी ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यंत्रणा वापरण्यास रात्री १२ वाजेपर्यंत विशेष सवलत देण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिली आहे.

ही सवलत संपूर्ण गणेशोत्सव कालावधीसाठी नसून केवळ आदेशात नमूद केलेल्या या चार दिवसांसाठीच लागू राहणार आहे. इतर दिवशी ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यंत्रांच्या वापराबाबत प्रचलित नियम व वेळमर्यादा लागू राहतील, असे जिल्हाधिकारी श्रीमती विसपुते यांनी स्पष्ट केले.

गणेशोत्सवाच्या काळात सार्वजनिक गणेश मंडळांमार्फत धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. उत्सवाच्या कालावधीत शाळकरी विद्यार्थी, नोकरदार तसेच नागरिकांना या कार्यक्रमांमध्ये सहभागी होता यावे, यासाठी गणेश मंडळांकडून विशेष सवलतीची मागणी करण्यात आली होती. त्या अनुषंगाने पाचवा, सातवा, नववा दिवस व अनंत चतुर्दशी या चार दिवसांसाठी रात्री १२ वाजेपर्यंतची सवलत देण्यात आली आहे.

मात्र, रात्री १२ वाजेपर्यंतची सवलत ही केवळ वेळेच्या मर्यादेबाबत असून ध्वनीमर्यादेत कोणतीही सवलत देण्यात आलेली नाही. ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० तसेच संबंधित न्यायालयीन निर्देशांनुसार निर्धारित ध्वनीमर्यादांचे काटेकोर पालन करणे सर्व गणेश मंडळांना बंधनकारक राहील. नियमानुसार सकाळी ६ ते रात्री १० हा दिवसाचा, तर रात्री १० ते सकाळी ६ हा रात्रीचा कालावधी मानला जातो. औद्योगिक क्षेत्रात दिवसा ७५ डेसिबल व रात्री ७० डेसिबल, व्यावसायिक क्षेत्रात दिवसा ६५ व रात्री ५५ डेसिबल, निवासी क्षेत्रात दिवसा ५५ व रात्री ४५ डेसिबल, तर शांतता क्षेत्रात दिवसा ५० व रात्री ४० डेसिबल इतकी अनुमत परिसर ध्वनीमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.




धार्मिक व सांस्कृतिक उत्सवांच्या निमित्ताने नियमानुसार वर्षातील ठरावीक दिवसांसाठी रात्री १० वाजेची वेळमर्यादा मध्यरात्री १२ वाजेपर्यंत शिथिल करण्याची तरतूद आहे. गणेशोत्सवानिमित्त देण्यात आलेली ही सवलतही त्या नियामक चौकटीच्या अधीन राहील. त्यामुळे सवलतीच्या चारही दिवशी गणेश मंडळांनी निर्धारित वेळेसह ध्वनीमर्यादांचे पालन करणे आवश्यक आहे. रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालय परिसर तसेच अधिसूचित शांतता क्षेत्रांबाबत लागू असलेल्या निर्बंधांचे काटेकोर पालन करावे. ध्वनिक्षेपक अथवा सार्वजनिक उद्घोषणा यंत्रणा वापरण्यासाठी संबंधित सक्षम प्राधिकरणाची आवश्यक परवानगी घेणे बंधनकारक राहील.

गणेशोत्सव साजरा करताना लहान मुले, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि सर्वसामान्य नागरिकांना ध्वनीचा त्रास होणार नाही, याची प्रत्येक गणेश मंडळाने दक्षता घ्यावी. उत्सवाचा आनंद, नागरिकांचे आरोग्य आणि सार्वजनिक शांतता यांचा समतोल राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे, असे जिल्हाधिकारी श्रीमती विसपुते यांनी नमूद केले. गणेशोत्सव उत्साहात, शिस्तबद्ध आणि सामाजिक भान राखून साजरा करावा तसेच पाचवा, सातवा, नववा दिवस आणि अनंत चतुर्दशी या चार दिवसांसाठी देण्यात आलेल्या विशेष सवलतीचा जबाबदारीने उपयोग करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले आहे.

# आदिवासी बांधवांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचवा–पालकमंत्री जयकुमार रावल

धुळे (जिमाका) – आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन विविध लोककल्याणकारी योजना राबवित आहे. या योजनांची माहिती आणि त्यांचा प्रत्यक्ष लाभ जिल्ह्यातील प्रत्येक पात्र आदिवासी बांधवापर्यंत पोहोचविण्यासाठी 'सेवा संकल्प अभियान' प्रभावीपणे राबवावे, असे आवाहन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले आहे.

आदिवासी विकास विभागामार्फत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धुळे अंतर्गत शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य निवासी शाळा, नामांकित शाळा तसेच शासकीय आदिवासी मुला–मुलींच्या वसतिगृहांमध्ये 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. आदिवासी भागातील नागरिकांना विविध कल्याणकारी योजना आणि शासकीय सेवा सहज उपलब्ध करून देणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश असल्याचे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले. अभियानाच्या माध्यमातून शासनाच्या योजना थेट आदिवासी बांधवांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे. त्यासाठी सेवा चित्ररथ जिल्ह्यातील सर्व पेसा गावांमध्ये जाऊन आदिवासी समाजासाठी असलेल्या विविध योजना, आरोग्य, बालविवाह प्रतिबंध आणि व्यसनमुक्ती आदी विषयांबाबत जनजागृती करणार आहे. या माध्यमातून अधिकाधिक नागरिकांनी शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री श्री. रावल यांनी केले.

अभियान केवळ जनजागृतीपुरते मर्यादित न राहता पात्र नागरिकांना प्रत्यक्ष सेवा आणि योजनांचा लाभ मिळाला पाहिजे. त्यासाठी तालुकास्तरावर विशेष शिबिरे आयोजित करून आधार कार्ड, रेशनकार्ड, जातीचा दाखला, आयुष्मान कार्ड आणि अंत्योदय कार्ड यांसारखी आवश्यक कागदपत्रे नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले. दुर्गम भागातील आदिवासी बांधवांना विविध शासकीय सेवांसाठी वारंवार कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत. प्रशासनानेच त्यांच्यापर्यंत पोहोचून आवश्यक सेवा उपलब्ध करून द्याव्यात. विशेषतः गरजू कुटुंबे, महिला, विद्यार्थी आणि वंचित घटकांच्या अडचणी समजून घेऊन त्या प्राधान्याने सोडवाव्यात, असे पालकमंत्री श्री. रावल यांनी नमूद केले. पारधी समाजातील लाभार्थ्यांसाठी अभियान कालावधीत विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच वनपट्टेधारक लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रे आणि विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील. पात्र लाभार्थी कोणत्याही शासकीय योजनेपासून वंचित राहणार नाही, याची संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी, असे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले.

आदिवासी महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणावरही अभियानात विशेष भर देण्यात येणार आहे. ५ ऑक्टोबर, २०२६ रोजी वीरांगना राणी दुर्गावती यांच्या जयंतीनिमित्त आदिवासी महिला बचत गटांचा मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. पात्र महिला बचत गटांना विविध योजनांचा लाभ मिळवून देत त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना द्यावी, असे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले.

आश्रमशाळा आणि वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यात यावी. त्यासाठी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करून आवश्यकतेनुसार उपचार व मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी चित्रकला, वक्तृत्व, रांगोळी आणि निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे, असे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले.




'माझी शाळा, माझी सेवा' या उपक्रमांतर्गत आश्रमशाळा व वसतिगृह परिसरात स्वच्छता आणि वृक्षारोपणाचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जबाबदारीची भावना रुजविण्यासाठी या उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग वाढवावा, असे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले.

# हस्ती स्कूलच्या फुटबॉल पटूंची जिल्हास्तरावर निवड



दोंडाईचा – हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती पब्लिक स्कूल व ज्यु. कॉलेज दाऊळ शिवार दोंडाईचा येथील विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय शालेय फुटबॉल क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश मिळवत जिल्हास्तरावर कौतुकास्पद प्रवेश मिळविला.

जिल्हा क्रीडा अधिकारी धुळे यांच्यावतीने ०९/०९/२०२६ रोजी हस्ती क्रीडा संकुल येथे संपन्न झालेल्या तालुकास्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन हस्ती स्कूलच्या प्राचार्या रजिया दाऊदी यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी हस्ती स्कूल चे क्रीडा विभागप्रमुख प्रकाश खंडेराय उपस्थित होते. या ठिकाणी संपन्न झालेल्या फुटबॉल स्पर्धेत हस्ती स्कूलने आपले वर्चस्व गाजवत १४ व १९ वर्ष वयोगटातील मुलांनी प्रथम क्रमांक मिळविला. तर १७ वर्ष वयोगटात मुलींच्या संघाने विजय मिळविला. सदर फुटबॉल खेळाडूंची जिल्हास्तरावर कौतुकास्पद निवड करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या सदर यशाबद्दल हस्ती चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष व उद्योगपती अशोक जैन, कार्याध्यक्ष किशोर जैन, तसेच हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन व संचालक मंडळ समवेत हस्ती पब्लिक स्कूलचे प्राचार्या रजिया दाऊदी यांनी कौतुक केले व पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थ्यांना हस्ती स्कूलचे क्रीडाशिक्षक दुर्गेश पवार यांचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेला यशस्वी करण्याकरिता क्रीडा विभागप्रमुख प्रकाश खंडेराय, विशाल पवार, दिनेश माळी, चेतन नायक, हेमराज बैसाणे, क्रीडा शिक्षिका पुष्पा साळवे, कामिनी पाटील, आश्विनी गिरासे यांनी परिश्रम घेतले.

# तडजोडपात्र प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्याची संधी-प्रविण एन. कुलकर्णी

धुळे (जिमाका) – जिल्ह्यातील न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली तडजोडीस पात्र प्रकरणे मध्यस्थीच्या माध्यमातून सामंजस्याने निकाली काढण्यासाठी ‘राष्ट्रासाठी मध्यस्थी ३.०’ ही विशेष मध्यस्थी मोहीम १ ऑक्टोबर, २०२६ पासून ९० दिवसांसाठी राबविण्यात येणार आहे. संबंधित पक्षकारांनी या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रविण एन. कुलकर्णी यांनी केले आहे.

सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली तसेच राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मध्यस्थी मोहीम राबविण्यात येत आहे. मध्यस्थी आणि सामंजस्य प्रकल्प समिती (Mediation and Conciliation Project Committee), महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण तसेच उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.एस. भीष्म यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती श्री. कुलकर्णी यांनी दिली.

जिल्ह्यातील न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या आणि तडजोडीस पात्र ठरणाऱ्या प्रकरणांना या विशेष मोहिमेत मध्यस्थी प्रक्रियेसाठी घेण्यात येणार आहे. ज्या पक्षकारांची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत आणि ती परस्पर सामंजस्याने मिटविण्याची त्यांची इच्छा आहे, अशा पक्षकारांना या मोहिमेचा लाभ घेता येणार असल्याचे श्री. कुलकर्णी यांनी सांगितले. मध्यस्थी प्रक्रियेत संबंधित पक्षकारांना प्रत्यक्ष अथवा आभासी पद्धतीने सहभागी होता येणार आहे. इच्छुक पक्षकारांनी जिल्हा न्यायालय, संबंधित तालुका न्यायालय अथवा न्यायालयाच्या आवारातील जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धुळे यांच्याशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. न्यायालयांमध्ये अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली तडजोडपात्र प्रकरणे मध्यस्थीच्या माध्यमातून निकाली काढल्यास पक्षकारांचा वेळ, पैसा व श्रमाची बचत होण्यास मदत होते. तसेच परस्पर सामंजस्यातून सुलभ व जलद न्याय मिळण्याचा मार्गही सुकर होतो, असे श्री. कुलकर्णी यांनी नमूद केले. जिल्ह्यातील संबंधित पक्षकारांनी ‘राष्ट्रासाठी मध्यस्थी ३.०’ या विशेष मोहिमेचा लाभ घेऊन तडजोडीस पात्र प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धुळे प्रविण एन. कुलकर्णी यांनी केले आहे.

# धुळ्यात २१ सप्टेंबर रोजी महिला लोकशाही दिनाचे आयोजन

धुळे (जिमाका) – जिल्ह्यातील समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांच्या हक्काचे संरक्षण होवून त्यांना न्याय मिळावा. यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून प्रत्येक महिन्यात जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. माहे सप्टेंबर, २०२६ महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, २१ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथे आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती सदस्य सचिव, महिला लोकशाही दिन तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, धुळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

महिला लोकशाही दिनाचे अर्जाचा नमुना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, प्लॉट नं. ५२, जयहिंद कॉलनी, देवपुर, धुळे येथे मिळतील. अर्ज विहित नमुन्यात असावा, तक्रार/निवेदन हे अर्जदाराचे वैयक्तिक असावे. तसेच न्यायप्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, सेवा विषयक, आस्थापना विषय अर्ज/तक्रार/निवेदन तसेच पोस्टाने पाठविलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. असे सदस्य सचिव, महिला लोकशाही दिन तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, धुळे यांनी कळविले आहे.

## ग्रामपातळीवर लोकसहभागातून अभियान प्रभावीपणे राबवा-मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार

धुळे (जिमाका) – ‘सेवा संकल्प अभियान’ हे केवळ कार्यक्रमांच्या आयोजनापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष नागरिककेंद्रित झाले पाहिजे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना आणि सेवा पात्र नागरिकांपर्यंत सुलभपणे पोहोचवून त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यास प्राधान्य द्यावे. अभियानातील प्रत्येक उपक्रमाचे सूक्ष्म नियोजन करून सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने व कालबद्ध पद्धतीने अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज ‘सेवा संकल्प अभियान–२०२६’च्या जिल्हास्तरीय अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, उपजिल्हाधिकारी बालाजी क्षीरसागर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप, जिल्हा नियोजन अधिकारी संतोष वानखेडे, धुळे पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र अग्रवाल, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ. गिरीष पाटील, कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त चंद्रकांत दुसाने, प्राथमिक शिक्षणाधिकारी वैभव भास्कर यांच्यासह विविध विभाग व यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत राज्यात ‘सेवा संकल्प अभियान’ राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून शासनाच्या विविध सेवा सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच लोकसहभागातून विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

# ओमप्रकाश अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त ऋविद्यावर्धिनी’च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

## मोबाईल क्रमांकासह नावनोंदणी करा-महेश घुगे



धुळे– शहरातील प्रसिद्ध उद्योजक, भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, सामाजिक, शैक्षणिक, सहकार, आध्यात्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य असलेले प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व तथा धुळे शहराचे आमदार अनुपभैय्या अग्रवाल यांचे पिताश्री ओमप्रकाश पुरणमल अग्रवाल, यांचा येत्या पाच ऑक्टोबरला अमृतमहोत्सवी वाढदिवस सोहळा होत आहे. यानिमित्त शहरातील प्रसिद्ध विद्यावर्धिनी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असलेल्या श्री. अग्रवाल यांच्या काळातील सहयोगी माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा होत आहे. या स्नेहमेळाव्यासाठी संबंधित माजी विद्यार्थी–विद्यार्थिनींनी आपल्या मोबाईल क्रमांकासह नावनोंदणी करावी, असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार महेश घुगे यांनी केले आहे.

या संदर्भात श्री. घुगे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे, की ज्येष्ठ उद्योजक ओमप्रकाश अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवस सोहळ्यानिमित्त अमृतमहोत्सव समितीतर्फे शहरात येत्या चार व पाच ऑक्टोबरला विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत विविध धार्मिक गीतगायनांच्या कार्यक्रमांसह श्री. अग्रवाल यांचा सन्मानपत्र देत अभीष्टचिंतन सोहळा होणार आहे. याच अनुषंगाने श्री. अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधत विद्यावर्धिनी महाविद्यालयातील श्री. अग्रवाल यांचे तत्कालीन सहयोगी, माजी विद्यार्थी–विद्यार्थिनींचा माजी विद्यार्थी संयोजन समितीतर्फे स्नेहमेळावाही घेण्यात येणार असून, त्यात श्री. अग्रवाल यांचा मानपत्र देऊन भव्य सत्कार करण्यात येणार आहे. या स्नेहमेळाव्याचे ठिकाण व तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल. या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी तत्कालीन सहयोगी माजी विद्यार्थी–विद्यार्थिनींनी महेश घुगे यांच्या ९४२२७ ७६३१८ या व्हॉट्स प क्रमांकावर आपले नाव, गाव तसेच मोबाईल क्रमांकासह नोंदणी करावी, असे आवाहनही श्री. घुगे यांनी केले आहे.

# ‘सेवा संकल्प अभियान’मध्ये महिला शेतकऱ्यांनी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज करावा-जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सूरज जगताप

धुळे (जिमाका) – राज्य शासनाच्या ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत जिल्ह्यातील अधिकाधिक पात्र महिला शेतकऱ्यांनी महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज करून आपल्या हक्काचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सूरज जगताप यांनी केले आहे. राज्यातील महिला शेतकऱ्यांना कायदेशीर ओळख मिळवून देण्यासाठी विधिमंडळाने ‘महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०१६’ हा कायदा एकमताने संमत केला आहे. या अधिनियमानुसार प्रत्यक्ष शेती तसेच शेतीपूरक व्यवसायामध्ये काम करणाऱ्या महिलांना ‘महिला शेतकरी’ म्हणून प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याची माहिती श्री. जगताप यांनी दिली. कृषी विभागामार्फत महिला शेतकऱ्यांना विविध शासकीय कृषी योजना व उपक्रमांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेले महिला शेतकरी प्रमाणपत्र आता ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येत आहे. पात्र महिला शेतकऱ्यांनी संबंधित पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करून आपल्या हक्काचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे, असे त्यांनी सांगितले.

महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी अर्ज करताना प्रथम https://uat-mahakrishi.mahaitgov.in/mahila-shetkari-service /या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन "Apply Now' हा पर्याय निवडावा. त्यानंतर आधारनुसार नाव व जिल्हा निवडून नोंदणीकृत मोबाईलवर प्राप्त झालेला ओटीपी टाकून माहितीची पडताळणी करावी. पुढील टप्प्यात अर्जदाराने आपली वैयक्तिक व शेतीविषयक माहिती भरावी. त्यामध्ये पत्ता, जात प्रवर्ग तसेच करत असलेल्या शेतीकामाचा प्रकार, उदाहरणार्थ पीक लागवड, पशुपालन आदी माहिती योग्य प्रकारे निवडून नोंदवावी, असे श्री. जगताप यांनी सांगितले. त्यानंतर शेतकरी आयडी जोडण्याची प्रक्रिया पूर्ण करावी. कुटुंबातील सदस्याचा ऋशीशी खऊ उपलब्ध असल्यास तो नमूद करून त्याची पडताळणी करावी. सर्व आवश्यक माहिती भरल्यानंतर ती अचूक असल्याची खात्री करून "Submit Application' या पर्यायावर क्लिक करून अर्ज सादर करावा. अर्जदारांनी अर्जातील माहिती अचूक भरावी तसेच अर्ज सादर करण्यापूर्वी सर्व तपशील काळजीपूर्वक तपासून घ्यावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

राज्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत ‘सेवा संकल्प अभियान’ राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून शासकीय सेवा व योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यावर भर देण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून धुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिला शेतकऱ्यांनी या ऑनलाईन सुविधेचा लाभ घेऊन महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा आणि आपल्या हक्काचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सूरज जगताप यांनी केले आहे. यासंदर्भात अधिक माहिती अथवा मार्गदर्शनासाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालय किंवा कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा, असेही श्री. जगताप यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

# ‘लोकसंवाद-२०२६’ला साक्री तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

## ‘लोकसंवादाची वारीगणेशभक्तांच्या दारी’ ; चित्ररथातून शासकीय योजनांचा गावागावांत जागर






धुळे (जिमाका) – माहिती व जनसंपर्क विभागाच्या ‘गणेशोत्सवातून लोकसंवाद-२०२६’ या विशेष जनजागृती अभियानाला साक्री तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जिल्हा माहिती कार्यालय, धुळे यांच्यातर्फे तयार करण्यात आलेला नाविन्यपूर्ण ‘लोकसंवाद’ चित्ररथ तालुक्यातील विविध गावांमध्ये तसेच सार्वजनिक गणेश मंडळांच्या परिसरात फिरून शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना, उपक्रम आणि सेवांची माहिती दृकश्राव्य माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचवत आहे.

गणेशोत्सव हा श्रद्धा, उत्साह आणि व्यापक लोकसहभागाचा उत्सव आहे. सार्वजनिक गणेश मंडळांच्या परिसरात मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येत असल्याने या लोकसहभागाचा प्रभावी उपयोग शासनाच्या विविध योजनांची माहिती थेट जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी करण्यात येत आहे. ‘लोकसंवादाची वारी गणेशभक्तांच्या दारी’ या संकल्पनेतून चित्ररथ गावोगावी पोहोचत असून, गणेश दर्शनासाठी आलेल्या भाविकांना शासनाच्या योजनांची माहिती सहज, सोप्या आणि प्रभावी पद्धतीने दिली जात आहे. चित्ररथावर प्रदर्शित करण्यात आलेले माहितीफलक, योजनांचे संदेश आणि दृकश्राव्य सादरीकरण नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. शेतकरी, महिला, विद्यार्थी, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य कुटुंबांसाठी उपयुक्त असलेल्या विविध योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होत असल्याने नागरिकांकडून या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.




विविध योजनांची माहिती – या अभियानाच्या माध्यमातून कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, शिक्षण, सामाजिक न्याय, कौशल्य विकास, रोजगार आदी विभागांच्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. शेतकऱ्यांसाठी कृषीविषयक योजना, पीक विमा, अनुदान योजना, महिलांसाठी बचत गट व सक्षमीकरणाच्या योजना, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, युवकांसाठी कौशल्य विकास व रोजगाराच्या संधी, तसेच आरोग्यविषयक विविध योजनांबाबत जनजागृती करण्यात येत आहे. शासनाच्या विविध योजनांची पात्रता काय आहे, संबंधित योजना कोणत्या विभागामार्फत राबविली जाते आणि अधिक माहितीसाठी कुठे संपर्क साधावा, याबाबतही नागरिकांना मार्गदर्शन केले जात आहे. त्यामुळे जनजागृतीसोबतच पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांची माहिती पोहोचविण्याचा उद्देश या अभियानातून साध्य होत आहे.

दहिवेलमध्येही उत्स्फूर्त प्रतिसाद – अभियानांतर्गत साक्री तालुक्यातील दहिवेल येथील ‘दहिवेलचा राजा गणेश मित्र मंडळ’ परिसरातही ‘लोकसंवाद’ चित्ररथाद्वारे शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. यावेळी सहनिबंधक अधिकारी सुरेश पवार, दहिवेल ग्रामपंचायत सदस्य कन्हैयालाल माळी, गावातील प्रतिष्ठित नागरिक प्रभाकर सोनवणे, रुपेश बच्छाव जिल्हा माहिती कार्यालयाचे बंडू चौरे आदी उपस्थित होते.

गणेश दर्शनासाठी आलेल्या नागरिकांनी चित्ररथावरील विविध योजनांची माहिती उत्सुकतेने जाणून घेतली. योजनांची माहिती थेट गावात आणि गणेश मंडळाच्या परिसरात मिळत असल्याने हा उपक्रम अधिक उपयुक्त आणि परिणामकारक ठरत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. गणेशोत्सवाला लोककल्याणकारी संवादाची जोड – ‘लोकसंवाद-२०२६’ अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे नागरिकांनी योजनांची माहिती शोधत कार्यालयात येण्याऐवजी शासनाची माहितीच नागरिकांच्या दारी पोहोचविण्याचा प्रयत्न होय. गणेश मंडळांच्या माध्यमातून थेट नागरिकांशी संवाद साधल्यामुळे शासन आणि नागरिक यांच्यातील माहितीचा दुवा अधिक मजबूत होत आहे. नागरिकांना त्यांच्या जीवनात उपयुक्त ठरणाऱ्या शासकीय योजनांची अधिकृत माहिती मिळावी, पात्र लाभार्थ्यांनी योजनांचा लाभ घ्यावा आणि शासनाच्या विविध उपक्रमांविषयी जनजागृती व्हावी, हा ‘लोकसंवाद-२०२६’चा मुख्य उद्देश आहे. साक्री तालुक्यात मिळत असलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे गणेशोत्सवाला लोकसंवाद, लोकसहभाग आणि लोककल्याणाची अर्थपूर्ण जोड मिळाली असून, ‘लोकसंवाद’ चित्ररथ शासनाच्या योजना थेट जनतेपर्यंत पोहोचविणारे प्रभावी माध्यम ठरत आहे.

# हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट व दोंडाईचा पोलीस स्टेशन च्या संयुक्त विद्यमाने नशामुक्त भारत विषयावरील निबंध स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

दोंडाईचा – हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित व दोंडाईचा पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, दोंडाईचा येथे हस्ती संस्थेचा रजत महोत्सवानिमित्त ‘नशामुक्ती भारत’ या विषयावर खुली निबंध स्पर्धा २०२६ ही हस्ती ग्रुप ऑफ स्कूल्सचे चेअरमन कैलास जैन व दोंडाईचा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिनेश सोनवणे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेतील विजेत्यांचा बक्षीस वितरण समारंभ हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे मुख्य कार्यालय काराणी ज्ञानदीप येथे उत्साहात पार पडला. इयत्ता ६ वी ते ८ वी या गटात ‘व्यसनाला नकार, जीवनाला होकार’ या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. या गटात प्रथम क्रमांक नेहा नीलिमा संजय पाटील (नूतन माध्यमिक विद्यालय, दोंडाईचा), द्वितीय क्रमांक कुमार सनीकुमार चिंतादेवी जितेंद्र सिंह (स्वामी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल, दोंडाईचा) आणि तृतीय क्रमांक आयशा आफरीन अशरफ कुरेशी (हस्ती पब्लिक स्कूल, दोंडाईचा) यांनी मिळविला.

इयत्ता ९ वी ते १२ वीच्या गटात ‘नशामुक्त समाज घडविण्यात विद्यार्थ्यांची भूमिका’ या विषयावर निबंध स्पर्धा झाली. यामध्ये प्रथम क्रमांक अथर्व हर्षा सुधिर भावसार (नूतन माध्यमिक विद्यालय, दोंडाईचा), द्वितीय क्रमांक प्रांजल वैशाली वासुदेव पाटील (नूतन माध्यमिक व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय, दोंडाईचा) आणि तृतीय क्रमांक हर्षदा रुपाली दीपक पवार (आर.एम.आर. गर्ल्स हायस्कूल, दोंडाईचा) यांनी पटकावला.




महाविद्यालयीन व खुल्या गटात ‘व्यसन : व्यक्ती, कुटुंब आणि समाजावरील घातक परिणाम’ या विषयावर स्पर्धा घेण्यात आली. या गटात प्रथम क्रमांक उपशिक्षक प्रशांत योजनाबाई रमेश पाटील, द्वितीय क्रमांक श्री. मंगलसिंग कलाबाई शामसिंग राजपूत (सहाय्यक शिक्षक, हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज, दोंडाईचा) आणि तृतीय क्रमांक श्रीमती रजनी मंगला जगन्नाथ पाटील (उपशिक्षिका नूतन माध्यमिक व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय, दोंडाईचा) यांनी मिळविला. या स्पर्धेत विजेत्यांना प्रथम क्रमांकास १००० हजार रुपये रोख व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकास ७०० रुपये रोख व प्रमाणपत्र तर तृतीय क्रमांकास ५०० रुपये रोख व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत दोंडाईचा परिसरातील ६५० पेक्षा जास्त विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे बक्षीस वितरण पोलीस निरीक्षक दिनेश सोनवणे साहेब यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. यावेळी सर्व प्राचार्य व समन्वयक उपस्थित होते. या स्पर्धेसाठी प्रकल्प समन्वयक मनोज ठाकूर यांनी परिश्रम व निबंध परीक्षणसाठी जेष्ठ सेवानिवृत्त शिक्षक गोकुळ सैंदाणे व अविनाश पाटील यांनी सहकार्य घेतले. स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसह समाजात व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. विजेत्यांचे आयोजकांकडून अभिनंदन करण्यात आले.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर –
भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)